# 11 फेब्रुवारी

## आजचा सुविचार :

"नाही हा शब्द तुम्हाला ऐकू येत नाही, तोपर्यंत सगळे काही शक्य आहे."

## आजचे पंचांग :

वार – शुक्रवार

मास - माघ

नक्षत्र – मृग

सूर्योदय – सकाळी 7.01 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6.34 वाजता

## आजचे दिनविशेष :

1. 1847 ला आजच्या दिवशी महान शात्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांचा जन्म.

2. 1990 - वीस वर्षे राजकीय कैदी म्हणून तुरुंगात असलेल्या नेल्सन मंडेलांची केप टाऊन जवळच्या तुरुंगातून सुटका.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Help – मदत

2) Hill - टेकडी

3) History – इतिहास

4) Holiday – सुट्टी

## आजची प्रश्नमंजुषा :

1) सरपटणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

2) पाणी सजीव आहे कि निर्जीव?

3) तुमच्या इंग्लीश नावामध्ये किती अक्षरे आहेत ते सांगा.

4) जलचक्र म्हणजे काय?

**बोधकथा :**

## स्वत:ला ओळखा

आपण म्हणतो कि, हे मला जमत नाही,ते मी करणार नाही, जे मला येत तेच मी करेल , ते क्षेत्र माझ नाही तर मी कशाला करू , मी ज्या क्षेत्रात शिकते आहे तर मी त्यातच माझे करिअर करेल...

तर हे चुकीचे आहे. आपल्याला जे येत ते ही करा , आणि जे येत नाही ते ही करा. आपल्याला एखाद्या गोष्टीत रस आसला तर आपण ती गोष्ट मना पासुण करतो. जे येत नाही किंवा करायचे नाही त्याकडे आपण लक्ष सुद्धा देत नसतो, कारण आपण प्रयत्नच करत नाही. म्हणुन आपल्याला येत नाही...

जेव्हा आपल्याला आपले आई-वडील शाळेत टाकतात, तेव्हा कुठे आपल्याला काय येते , काहीच येत नाही, मग शाळेत गेल्यावर आपल्याला आपले शिक्षक, घरी आपले आई-वडील शिकवतात तेव्हा आपल्याला वाचता ,लिहीता येते , तसेच कुठल्या ही क्षेत्रात काम करायला आपण आधी त्या क्षेत्रा विषयी ज्ञान मिळवा मग सर्वच येईल...

का जन्माला येताच तुम्ही ठरवुन येता,कि मी हे करणार आहे, मला तेच करायचे आहे , मला ते जमनार नाही , नाही ना आपण आधी ते शिकतो मगच आपल्याला येत. मग करण्या आधीच जर नाही म्हटले तर नाही येणार...

आपण आपली मानसीकता बदलतच नाही तर आपल्याला काय येणार आहे बर, जर आधीच आपण नाही म्हणून पडतो तर ईच्छा होईल का काही करायची , एकदा हो म्हणून बघा , हो मला येईल हे, मी करु शकते. मग बघा तुम्हाला जे येत नाही तुम्ही ते करून दाखवाल...

कुठले ही क्षेत्र असो , आपल्याला त्या क्षेत्रा चे ज्ञान असलेच पाहिजे, त्या क्षेत्रात आपण आपली ओळख निर्माण केली पाहिजे. मनुष्य जन्म एकचदा मिळतो त्याचा फायदा नक्कीच घेता आला पाहिजे , आपल्याला सगळ्या क्षेत्रात आपले नाव कमवता आले पाहिजे...

इंद्रधनुष्यात सात रंग आहे, त्या सात रंगांवरुण त्याची ओळख आहे. तसेच आपल्याला, आपल्या मधले सप्तरंगी गुणांची ओळख जगा समोर दाखवता आली पाहिजे . आपल्यातले टॅलेंट , आपल्या मधली काही तरी करूण दाखवण्याची जिद्द जगा समोर आली पाहिजे...

तुम्हाला सर्व काही येते, फक्त पाहिजे ती म्हणजे मानसिकता , आपण ठरवले तर काही ही करु शकतो, कुठल्या ही क्षेत्रात आपण काम करु शकतो. आपल्याला फक्त स्वत:ला ओळखता आले पाहिजे, आपल्या मधले गुण आपल्याला दाखवता आले पाहिजे . मग सर्व काही आपल्यासाठी सोप्प होत जाते , अवघड काही वाटत नाही.